International Journal of Advance and Applied Research (IJAAR) | ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly | Impact Factor – 5.136
Vol.4 No.6 July - Aug 2017

# बा. भ. बोरकर यांच्या कवितेचे वेगळेपण

**डॉ. हृणमंत रामचंद्र पोळ**
राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय औंध

**प्रस्तावना –**

बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९१० रोजी गोव्यातील कुडचडे या आजोळी झाला. बोरी हे त्यांचे गाव ,या गावाच्या नावावरून त्यांनी बोरकर हे आडनाव धारण केले. दुसरीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर ते गोव्याबाहेर राहिले.मुंबईत ते नोकरीसही लागले परंतु गोव्याची ओढ अस्वस्थ करत असल्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. गोव्यात शिक्षकाची नोकरी स्वीकारली. कवितालेखनाव्यतिरिक्त बोरकर यांनी ६ अनुवाद ,२ कथासंग्रह ,४ कादंबऱ्या ,१० कोकणी साहित्यकृती ,२ चरित्रात्मक निबंध ,४ ललितलेखसंग्रह , कुसुमाग्रजांची निवडक कविता रसयात्रा इत्यादी लेखन केले आहे . गोव्यातल्या संथ व शांत वातावरणात कुमारवयापासून जडलेला काव्य लेखनाचा छंद पुढे बहरत गेला. १९६१ रोजी गोवा स्वतंत्र झाल्यावर तृप्त मानाने ते गोव्याला रहावयाला आले .यावरून बोरकर आणि गोमंतक किती एकजीव होते हे जाणवते. गोव्यातल्या निसर्गरम्य वातावरणात बोरकरांचे बालपण गेले. कोणत्याही रसिक माणसाला गोव्याच्या निसर्गाचे लोभसवाणे रूप मन मंत्रमुग्ध करून टाकते. त्यांच्या कवितेतील प्रणय निसर्गातून खुलल्याचे दिसून येते.

**विवेचन-**

बा. भ. बोरकर हे तांबे संप्रदायातील कवी आहेत. १९३०ते १९७० या दीर्घ काळात त्यांनी काव्यलेखन केले. आधुनिक कवितेच्या कौतुकाच्या काळापासून सुरु झालेली त्यांची कविता नवकवितेच्या बहरापर्यंत त्यांचे लेखन चालू होते .बोरकरांच्या कवितेबद्दल अरुणा ढेरे लिहितात ,"कवितेतले अंतःसंगीत ही काय आणि किती मौलिक गोष्ट आहे. याची जाणीव प्रथम बोरकरांनी करून दिली .प्राचीन भारतीय संस्कृतीचा संपन्न वारसा अतिउत्सहाने सांगणारी मिथाकांची सृष्टी त्यांच्याच कवितेत प्रथम वैपुल्याने बहरली [१]."ढेरे म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या कवितेत मिथके आहेत .त्यांच्या कवितेतून ढेरे यांना कवितेतील अंतःसंगीताची महती समजली. एकंदरीत बोरकरांच्या कवितेचा त्यांच्या लेखनावर झालेला प्रभाव त्यांनी

व्यक्त केला आहे. बोरकरांची कविता प्रवाही आहे तिच्यात कधी अनपेक्षित सौंदर्य दिसते तर, कधी शब्दबंबाळ स्वरूप दिसते.

निसर्ग आणि प्रेम ही बोरकरांच्या कवितेची स्थायी केंद्रे आहेत. त्यांची कविता याच दोन केंद्राभोवती फिरते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ऐहिकता आणि आध्यात्मिकता ,पाश्चात्य आणि पौर्वात्य विचार यांचे मिश्रण आहे. गोव्यातील ख्रिस्ती समाजातील सौदार्यासाक्त मोकळ्या जीवनदृष्टीचे त्यांच्यावर संस्कार आहेत. बोरकर एका विख्यात विदुषीच्या संपर्कात आले ते लिहतात ,"भारतियांच आत्मदर्शन आणि ग्रीकांची सौंदर्यदृष्टी याचं अद्वैत मला साधता आले पाहिजे असा तिचा आग्रह होता आणि मला केव्हातरी शक्य होईल अशी तिची श्रद्धा होती .[२]"त्यांच्या काव्यात आपणास पौर्वात्य व पाश्चात्य या संस्कृतीचा संगम पहावयास मिळतो .वा.ल.कुलकर्णी याबाबत लिहतात ,"आपण नेहमी शृंगार व शांत हे परस्पर विरोधी रस आहेत असे समजतो .परंतु बोरकरांच्या कवितेत शृंगार आणि शांत हे दोन्ही रस परस्परांच्या हातात हात घालून मिरवताना दिसतात .प्राकृतिक सौंदर्य आणि आध्यात्मिक सौंदर्य यांना सारखेच वेड लावते .शरीर अनुभवाचे सौदर्य ते जितक्या कालात्मपणे व्यक्त करू शकतात ,तितकेच आध्यात्मिक अशरीरी अनुभवाचे सौंदर्य साकार करण्यात रंगून गेलेले दिसतात .[३] " वा .ल .कुलकर्णी यांनी बोरकरांच्या कवितेचे वेगळेपण नेमक्या शब्दात सांगितले आहे.

बोरकरांच्या निसर्ग कवितेचे वैशिट्य म्हणजे प्रादेशिकता .त्यांच्या कवितेतील प्रतिमा ह्या भाववृत्तीला साद देतात .त्यांचे निसर्गभान सांकेतिक नाही .आकाश ,वारा ,ढग ,ऊन ,पाऊस ,समुद्र ,चांदणे ,झाडे ,रात्र, काळोख, सांज, दुपार हे निसर्गघटक बोरकरांचे काव्यविषय झाले आहेत .त्यांच्या कवितेतील चंद्र – चांदण्यांचे उल्लेख पाहण्यासारखे आहेत ,संगीताप्रमाणे चांदणेही भावधारी आहे .त्यांच्या कवितेत निसर्गसौंदर्य, शृंगारभाव, संगीतानुरुक्ती व अध्यात्मप्रवणता एकत्र झालेली दिसते.

केवळ चंद्रच नाही तर संपूर्ण निसर्ग प्रणयाची अनुभूती देतो. बोरकरांची प्रेमकविता ही निसर्गकविता आहे आणि निसर्गकविता ही प्रेमकविता आहे .रा .चिं .ढेरे लिहतात ,"बोरकरांच्या निर्माणकतेच्या संदर्भात मला सारखे वाटत आले आहे की ,या निर्माणकतेच्या मुळाशी त्यांच्या नेनिवेतच नाद ,स्त्री आणि निसर्ग यांचा एखादा एकजीव बंध प्रखरपणे कार्यरत असला पाहिजे .माणसाच्या आदिम मनात निर्माणशक्तीचीच तर ही पर्यायी रूपे होती[४]."ढेरे म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या कवितेत प्रेमभावना व निसर्ग एकरूप झाले आहेत .त्यांचा निसर्ग प्रेयसीचे सारे भावलावण्य स्वतःमध्ये सामाऊन घेत असतो. प्रेमाचा शरीर आविष्कार बोरकरांनी महत्वाचा मानला .रसिकतेने प्रेमभावना व्यक्त केल्या .स्त्रीचे शरीरसौंदर्य, विभ्रम, लाघवीपणा यांची रूपे त्यांच्या कवितेत आढळतात. त्यांची प्रेमजाणीव स्त्री – पुरुषातील अगम्य, गूढ, सनातन, निरंतर शाश्वत अमूर्त अशा भावप्रीतीचा शोध घेत असते.

रमेश तेंडुलकर त्यांचा कवितेच्या वेगळेपणाबद्द्ल लिहतात ,"मनातल्या प्रखर उन्हाला चांदण्याची भूल देण्याची किमया बोरकरांची कविता जेव्हा करते ,तेव्हा तिने आपल्या मनाचे एका सुंदर यक्षभूमीत सहज रुपांतर करून टाकलेले असते व तेथे ऐकू येत असते आपल्याला केवळ गंधर्वगान !त्याच सुरांनी आपण भाराऊन ओथंबून गेलेलो असतो .५ " रमेश तेंडुलकर यांनी बोरकरांच्या कवितेचे वेगळेपण नेमक्या शब्दात सांगितले आहे .ते म्हणतात त्याप्रमाणे त्यांची कविता मनातल्या प्रखर ऊन्हाला चांदण्याची भूल देते .

बोरकर मर्ढेकरांच्या काळात वावरूनही त्यापेक्षा वेगळे होते .त्यांच्या प्रतिभेचा विचार केला तर ते काळाच्या निरपेक्ष पातळीवरून लिहित होते .निसर्ग ,प्रेमभावना यातील सौंदर्याचा आस्वाद घेणे ही त्यांची मूळ प्रकृती आधुनिक मराठी कवितेच्या क्षेत्रात गोविंदाग्रज ,बालकवी ,तांबे ,कुसुमाग्रज ,यशवंत, मार्ढेकर, विंदा करंदीकर या कवींनी विविध पद्धतीने उद्दिष्टानुसार कवितेत मिथके वापरली .बोरकरांनी मिथकांचे उपयोजन संस्कारसिद्धीसाठी केले .प्रतिभा आणि मिथकांमुळे त्यांच्या कवितेत निसर्ग अधिकच साजीवपण घेऊन येतो .'माझ्या गोव्याचा भूमीत 'या कवितेत त्याचा प्रत्यय येतो .निसर्गाच्या बरोबरीने बोरकरांच्या कवितेतील प्रणयाची अनुभूती सर्जनशील आणि इंद्रिय स्वरुपाची आहे .'जपानी रमलाची रात्र 'या कवितेत प्रणयदर्शन उद्दीपक आहे .पण उथळ नाही .त्यांची कविता ही इतर काविपेक्षा वेगळी आहे .मंगेश पाडगावकर त्यांचा कवितेबद्दल लिहतात ,"बोरकरांनी त्यांच्याच काळात लिह्णाऱ्या कुसुमाग्रजांसारखी समाजनिष्ठ कवितेची कास धरली नाही .मर्ढेकरांसारखे यंत्र युगीन माणसाच्या ठणकत्या दुःखनसांवर बोट ठेवले नाही .विकलतेला आणि वैफल्याला बाजूला सारून नवमानवांसाठी गीत गाणाऱ्या मुक्तिबोधांप्रमाणे जनजीवनात त्यांनी आपली राहुटी उभारली नाही .त्यांची कविता या सर्वांपेक्षा सर्वस्वी निराळी होती .६ " पाडगावकर म्हणतात त्याप्रमाणे बोरकरांची संपूर्ण कविता ही वेगळी आहे .बोरकरांची प्रेमकविता तांबेप्रणीत सीमांचे उल्लंघन करून पुढे गेली असली तरी तिचे नाते असलेच तर ते पु .शि .रेग्यांचा प्रेमकवितेशी काही प्रमाणात आहे .बोरकरांची स्वप्नाळू काव्यदृष्टी सौंदर्याच्या कांतीप्रमाने शेवटपर्यंत धुंद रहिली .

बा .भ .बोरकर हे आधुनिक मराठी वाड्मयातील एक महत्त्वाचे कवी आहेत . .१९३०ते १९८० या काळात मराठी कवितेने विविध वळणे घेतली असली तरी बोरकरांच्या कवितेचे आकर्षण तसेच टिकून आहे. सौंदर्यतत्त्वावर निष्ठा असणाऱ्या बोरकरांनी अनुभवांची बाह्यात्कारी सुखदुःखात्मक दिसणारी रूपे जीवनाच्या आनंदात्मकतेची स्पंदने म्हणून स्वीकारली .निसर्ग आणि प्रिती या गोष्टीना त्यांच्या भावजीवनात महत्त्वाचे स्थान आहे .आधुनिक मराठी कवितेत बोरकरांची कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरते ती तिच्या प्रतिभेच्या संपन्नतेमुळे आणि लयबद्धता ,नादमयता यामुळे .नाद्माधुर्याबरोबर अर्थघनता व भावसमृधता यातून ती आकार घेते .निसर्ग आणि प्रेम हे बोरकरांच्या कवितेचे केंद्रवर्ती विषय आहेत.

निसर्गप्रतिमांनी त्यांची कविता संपन्न आहे .मराठी साहित्यविश्वात आनंदयात्री कवी अशी बोरकरांची ओळख आहे.

बोरकर हे परंपराप्रेमी होते .त्यांच्या परंपराप्रेमावर झालेल्या सुगम व रसपूर्ण संस्कारांनी त्यांना कवी बनवले. ग्रीकांच्या सौंदर्यदृष्टीचे मर्म पाश्चात्य साहित्याच्या अभ्यासाने आणि पौर्वात्य विचारांचे सार संतांच्या अभ्यासातून त्यांनी आत्मसात केले .निसर्गसौंदर्य व स्त्रीलावण्य यातून बोरकरांना जीवनचैतन्याचा साक्षात्कार झाला .निसर्ग आणि प्रणय यांची त्यांच्या कवितेतून अनुभूती सर्जनशील व ऐन्द्रीय होती. गोव्याच्या सौंदर्याचा वेध घेताना बोलीतील शब्द संस्कृत अभिजित शब्द यांचा वापर करून स्वतंत्र शैली निर्माण करून दृक ,श्राव्य ,स्पर्श ,गंध ह्या इंद्रियसंवेदनांचा वेगळेपणाने वापर करीत त्यांनी प्रदेशाच्या रंगाला संस्कृतीस्पर्शाचे सौंदर्य दिले .

**निष्कर्ष –**

१ बोरकरांचे आडनाव बोरी या गावावरून त्यांनी स्वीकारले .

२ बोराकारंची कविता प्रवाही आहे .

३ त्यांच्या कवितेत मिथके संस्कारसिद्धीसाठी आली आहेत .

४ निसर्ग व प्रेम हे त्यांच्या कवितेचे केंद्रबिंदू आहेत .

५ त्यांच्या कवितेतील प्रणय उथळ नाही .

६ बोरकरांचा कवितेत प्राकृतिक व आध्यात्मिक सौंदर्य आढळून येते .

७ ते परंपराप्रेमी होते .

**संदर्भ –**

१ ढेरे अरुणा ,बोरकरांची समग्र कविता .

२ बोरकर बा .भ .,बोरकरांची समग्र कविता .

३ कुलकर्णी वा .ल .,मराठी कविता जुनी आणि नवी .

४ ढेरे रा .चिं .,बोरकरांची कविता

५ तेंडूलकर रमेश ,गीतभान .

६ पाडगावकर मंगेश ,बा .भ .बोरकर –साहित्यसमीक्षा